# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ५८ वा ❑ रविवार दि.०६ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बमुळे व्यापार युद्ध सुरू?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पहिले महायुद्ध अनेक कारणांमुळे झाले, ज्यात राष्ट्रवाद, साम्राज्यवाद, सैन्यवाद, गुप्त मुत्सद्देगिरी आणि आंतरराष्ट्रीय युती यांचा समावेश होता, पण मुख्य कारण म्हणजे ऑस्ट्रो-हंगेरियन वारस आर्कड्यूक फ्रांझ फर्डिनांड यांच्या हत्येमुळे युद्धाला सुरुवात झाली.

दुसरे महायुद्ध अनेक कारणांमुळे झाले, ज्यात जर्मनी आणि जपान यांसारख्या हुकूमशाही राष्ट्रांची साम्राज्यवादी धोरणे, पहिल्या महायुद्धानंतरच्या करारांमुळे निर्माण झालेली तणावपूर्ण परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची अपयशीपणा यांचा समावेश होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर शीत युद्धाला सुरुवात झाली अशी युद्ध परस्पर विरोधी विचारसरणीतून निर्माण झाले. सोवियत युनियनच्या परावानंतर शीतयुद्धाची समाप्त झाले..आणि तिसरे जागतिक युद्ध व्यापारातून होते की काय अशी परिस्थिती आता निर्माण झालेली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातून आयात होणाऱ्या वस्तूंवर १०% कर लादण्याचा आणि प्रमुख व्यापारी भागीदारांवर अतिरिक्त कठोर शुल्क लादण्याचा निर्णय घेतल्याने जागतिक व्यापार युद्धाची भीती निर्माण झाली आहे. दरम्यान, चीनने अमेरिकेला इशारा दिला आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी संभाव्य जागतिक व्यापार युद्ध सुरू केले आहे. त्यांनी जगभरातून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तू आणि सेवांवर किमान १० टक्के आणि ४९ टक्के इतके शुल्क लादले. भारतावर २६ टक्के कर देखील लादण्यात आला आहे. ट्रम्प हातात अनेक मोठे चार्ट घेऊन व्हाईट हाऊस रोझ गार्डनमध्ये पोहोचले आणि त्यांनी अमेरिकेच्या प्रमुख व्यापारी भागीदारांवर, चीन, युरोपियन युनियनपासून भारतापर्यंत, कडक कर लागू करण्याची घोषणा केली. ट्रम्प यांनी याला अमेरिकेसाठी ''मुक्ती दिन'' म्हटले. माझ्या मते, हा अमेरिकन इतिहासातील सर्वात महत्वाच्या दिवसांपैकी एक आहे... हा आपल्या आर्थिक स्वातंत्र्याची घोषणा आहे,'' असे ट्रम्प म्हणाले.

या घोषणेमुळे अनेक देशांमध्ये तात्काळ संतापाची लाट उसळली आहे. चीनने इशारा दिला की या शुल्कामुळे जागतिक आर्थिक विकासाला ''धोका'' बसू शकतो. अमेरिकेचा मित्र ऑस्ट्रेलिया म्हणाला की मित्र असे काही करू शकत नाही. जगभरातील अनेक देश बदला घेण्याची धमकी देत आहेत.

७८ वर्षीय ट्रम्प यांनी कोणत्याही उलथापालथी किंवा प्रतिहल्ल्याची भीती फेटाळून लावली आहे आणि या शुल्कामुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेला हरवलेला ''सुवर्णयुग'' परत मिळेल. तथापि, ज्या पद्धतीने देश एकामागून एक प्रतिक्रिया देत आहेत, त्यावरून अशी भीती व्यक्त केली जात आहे की ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे जागतिक स्तरावर व्यापार युद्ध सुरू झाले आहे.

**व्यापार युद्ध सुरू झाले आहे का?**

अमेरिकेने आपला महासत्ता प्रतिस्पर्धी चीनकडून येणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त ३४ टक्के शुल्क लादले आहे. बीजिंगने तात्काळ प्रत्युत्तरात्मक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आणि टॅरिफ यादीतील देशांचे ''गंभीर नुकसान'' होईल असा इशारा दिला. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे की अमेरिकेचे शुल्क ''आंतरराष्ट्रीय व्यापार नियमांचे पालन करत नाहीत आणि संबंधित पक्षांच्या कायदेशीर हक्कांना आणि हितांना गंभीरपणे हानी पोहोचवतात.''

कॅनडा आणि मेक्सिकोवर नवीन शुल्कांचा परिणाम होणार नाही कारण ट्रम्प यांनी ड्रग्ज तस्करी आणि बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यात अपयशी ठरल्याबद्दल त्यांना आधीच शिक्षा केली आहे – २५ टक्के शुल्क लादले आहे. तरीही ट्रम्पच्या २ एप्रिलच्या घोषणेनंतर, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी विद्यमान शुल्काविरुद्ध ''लढण्याचे'' वचन दिले.

तथापि, अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी फॉक्स न्यूजवर कोणत्याही प्रत्युत्तराविरुद्ध इशारा दिला, ''जर तुम्ही प्रत्युत्तर दिले तर तणाव वाढेल.''

एकंदरीत,

ट्रम्पने धमकी म्हणून सुरू केलेले व्यापार युद्ध आता कॅनडा, चीन आणि मेक्सिकोने अमेरिकेच्या शुल्कांवर प्रत्युत्तर दिल्याने पूर्णपणे विकसित झाले आहे.राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी चीन, कॅनडा आणि मेक्सिकोविरुद्ध सुरू केलेल्या व्यापार युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण होऊन आर्थिक स्थिरतेला धोका निर्माण झाला आहे. प्रशासन या शुल्कांद्वारे विशिष्ट राष्ट्रीय चिंता दूर करण्याचे उद्दिष्ट ठेवत असले तरी, त्याचे व्यापक परिणाम जागतिक स्तरावर उमटणार हे मात्र निश्चितच !

अमेरिका आणि जागतिक अर्थव्यवस्थांना संभाव्य हानी दर्शवते. परिस्थिती विकसित होत असताना, जागतिक व्यापारावरील प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी दीर्घकालीन परिणामांचा काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या प्रचार मोहिमेत दिलेल्या आश्वासनानुसार, चीन, कॅनडा आणि मेक्सिको येथून आयात होणाऱ्या आयातीवर शुल्काची एक धाडसी मालिका सुरू केली, ज्यामुळे जागतिक व्यापार तणाव लक्षणीयरीत्या वाढला आहे.

## पांढरकवडा येथे निघणार राम नवमी निमित्त शोभायात्रा



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पांढरकवडा** – प्रभू श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर पांढरकवडा शहरात दरवर्षीप्रमाणे या वर्षीही भव्य दिव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.प्रभू श्रीराम नवमी उत्सव शोभायात्रा समिती तर्फे रविवार, दिनांक ६ एप्रिल रोजी पांढरकवडातील या ऐतिहासिक परंपरेला मोठ्या उत्साहात उजाळा दिला जाणार आहे.अनेक दशकां पासून पांढरकवडा मध्ये ही परंपरा कायम असून, या वर्षीच्या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणून विविध देखावे,भजन मंडळे, पालखी आणि विशेष अतिथींचा समावेश असेल. शोभायात्रेचा मुख्य आकर्षण बिंदू म्हणजे रामरथ आणि विविध भव्य देखावे.प्रभू श्रीरामांच्या

जन्मोत्सवानिमित्त शहरातून भव्यदिव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून, रामलल्लांच्या देखण्या मूर्तीसह विविध दैवी स्वरूपातील देखावे साकारले जातील.यामध्ये प्रभू श्रीराम, हनुमान यांच्या भव्य मूर्ती असणारआहेत.या शिवाय शोभायात्रेत घोडेस्वार शिवाजी महाराज, पारंपरिक ढोल-ताशा पथके, आकर्षक पालख्या आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असेल. शोभायात्रे दरम्यान संपूर्ण पांढरकवडा शहर भगवामय होईल. प्रत्येक चौकात भव्य रांगोळ्यांची सजावट,भगवे ध्वज आणि रोषणाई केली जाणार आहे.या वर्षीची शोभायात्रा अधिक भव्य आणि विशेष स्वरूपाची असेल. यामुळे पांढरकवडा आणि परिसरातील सर्व रामभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि प्रभू श्रीरामाच्या भक्तीत तल्लीन होऊन शोभायात्रेचा आनंद घ्यावा, असे आवाहन श्रीराम हनुमान मंदिर देवस्थान चे उपाध्यक्ष सतीश झाजेरिया यांनी केले आहे.

शोभा यात्रेच्या सुरळीत आयोजनासाठी पोलीस प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्यात आले आहे. वाहतूक व्यवस्थापन,गर्दी नियमन आणि अनुशासन राखण्यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे.राम नवमी निमित्ताने मंदिरात नवमी निमित्त ९ दिवस भक्तिमय वातावरणात सुगम संगीतचे कार्यक्रम आयोजित केले आहे शहरात भक्ती आणि संस्कृतीचा संगम पहायला मिळणार असून, हा सोहळा भक्तांच्या मनात अविस्मरणीय ठरेल, अशी खात्री आयोजकांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमाचे आयोजन समितीचे अध्यक्ष कृष्णा गाऊत्रे, उपाध्यक्ष जतन करोसिया, सचिव विशाल ढोले कोषाध्यक्ष शुभम बोरूले, अक्षय नवाडे, अजय अनेरवार, अंकित जाधव, सूरज दर्शनवार, अजय शामावार, कार्तिक जंगठे, रुपेश प्रधान, विशाल मेश्राम, कृष्णा सामजवार, गोलू निकोडे, ओम उंबरकर, भाई जंगठे, सुजल कावडे आदि पदाधिकारी आहेत.

## आदिवासी लोककलेतून आदर्शवत संस्कृतीचे दर्शन-मंत्री डॉ. अशोक उईके

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**चंद्रपूर** – चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना हा तालुका राज्याच्या टोकावर असून हा भाग आदिवासीबहुल आहे. जल, जंगल आणि जमिनीचे रक्षण करणाऱ्या आदिवासींमुळेच संस्कृती जिवंत राहिली आहे. त्यांच्या लोककलेतून एका आदर्शवत संस्कृतीचे दर्शन आपल्याला होते, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले.

कोरपना येथे सांस्कृतिक कार्य विभाग, आदिवासी विकास विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या विशेष सहकार्याने आयोजित आदिवासी लोककला महोत्सवात अध्यक्ष म्हणून मंत्री डॉ. उईके बोलत होते. यावेळी मंचावर सांस्कृतिक कार्य मंत्री तथा माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार देवराव भोंगळे, कोरपनाच्या नगराध्यक्षा नंदा बावणे, उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, सांस्कृतिक विभागाच्या प्रज्ञा पाटील, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार आदी उपस्थित होते.

मंत्री डॉ. उईके म्हणाले, आदिवासी कला आणि संस्कृती ही गौरवप्राप्त आहे. अशा संस्कृतीचे दर्शन राज्यात व्हावे, यासाठी आमदार देवराव भोंगळे यांनी उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आदिवासी माणसाने कायम संस्कृती जपली आहे. देव, समाज, धर्म आणि संस्कृतीचे पालन करणारा हा समाज आहे. त्यांच्यामुळेच ही संस्कृती निरंतर जिवंत राहणार आहे. राज्याचा आदिवासी विकास मंत्री आणि या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून आदिवासीबहुल या क्षेत्राकडे १०० टक्के लक्ष राहील. आमदारांनी ज्या मागण्या केल्या आहेत, त्या नक्कीच पूर्ण केल्या जातील, असे डॉ. अशोक उईके यांनी आश्वस्त केले.



आदिवासी लोककला महोत्सव एक पर्वणी आहे. राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या तालुक्यात कार्यक्रमाचे आयोजन अतिशय चांगले केले आहे. भारताच्या कानाकोपऱ्यात आदिवासींचा आवाज बुलंद होईल, अशी त्यांची संस्कृती आहे. राज्याचा सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून आदिवासी लोककलेचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात नेण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी दिली. पुढे ते म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व तालुक्यात आनंदाचाचा आलेख वाढविण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळेच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सांस्कृतिक कार्यक्रमातून लोकांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत आहे. १ ते ४ मे दरम्यान मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युएल समीट होत आहे. तेथे आणि हिंदी फिल्म इंडस्ट्रीजमध्ये सुध्दा आदिवासी संस्कृती आणि त्यांची कला रुजविण्यासाठी प्रयत्न करणार, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आदिवासी समाज हा कष्टकरी आणि प्रामाणिक आहे. आदिवासी बांधवांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यामुळे प्रगतीच्या मार्गावर जाण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्वाचे आहे. आदिवासींच्या विकासाच्या संकल्पाचा हा विषय आहे. सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिंपिकमध्ये चंद्रपूर गडचिरोलीतील आदिवासी खेळाडू झळकले पाहिजे, असा आपला प्रयत्न आहे. देशाच्या विकासात चंद्रपूरचे योगदान महत्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. आमदार देवराव भोंगळे म्हणाले, कोरपना हा राज्याच्या शेवटच्या टोकावर आहे. माझ्या विधानसभा मतदार संघात कोरपना, जिवती आणि राजुरा हे तीन पेसा तालुके आहेत. माजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नामुळे तीन तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी एव्हरेस्ट शिखर सर करू शकले. कोरपना तालुक्यात आदिवासी सांस्कृतिक भवनासाठी १५ कोटी, माणिकगड किल्ला आणि विष्णु मंदिराचे जतन करण्यासाठी १० कोटी, गडचांदूर आणि कोरपना तालुक्याच्या विकासाठी प्रत्येकी १० कोटी तसेच या दोन्ही तालुक्यातील नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या इमारतीसाठी निधी द्यावा, अशा मागण्या त्यांनी केल्या.



## शिव तांडव स्तोत्र पठण कार्यक्रमातून आध्यात्मिक वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न- मुख्यमंत्री

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नागपूर** – शिव तांडव स्तोत्र हे शिवातील चांगल्या गुणांची स्तुती आहे. चांगल्या गुणांची स्तुती ही सकारात्मक ऊर्जा देण्यासह मनोबल उंचावण्याचे काम करते. जिथे कुठे अहंकारासारखी स्थिती निदर्शनास येते त्या अहंकाराला दूर करण्याचे मार्ग आध्यात्मात मिळतात. शिवतांडव स्तोत्राच्या अशा पठणासारख्या कार्यक्रमातून आपण सकारात्मक ऊर्जा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. कामठीतील श्री महादेव घाट परिसरात आज शिव तांडव स्तोत्र पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार परिणय फुके, माजी आमदार टेकचंद सावरकर, राजे मुधोजी भोसले आदी यावेळी उपस्थित होते.

अतिशय सुंदर असा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याबद्दल कामठीतील शिवराज्य प्रतिष्ठानचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिलांच्या स्वसंरक्षणार्थ विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासोबतच शिव तांडव स्तोत्र पठण यासारख्या कार्यक्रमाच्या आयोजनातून आपला आध्यात्मिक वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. शिव तांडव स्तोत्र पठण या अनोख्या उपक्रमाबद्दल कौतुकोदगार काढले तसेच येत्या काळातही अशा प्रकारचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

## लक्षवेधी छायाचित्र....




आम्ही सुद्धा ध्यानात बसतो बरं.....!

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

## राज्यातील शाळांचे जिओ टॅगिंग करा -मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई** – राज्यातील सर्व विभागांच्या शाळांमध्ये असलेल्या पिण्याचे पाणी, शौचालय यासह उपलब्ध भौतिक सुविधांचे जिओ टॅगिंग करण्यात यावे. नामांकित शाळांच्या सद्यस्थितीबाबत संबंधित विभागाने पडताळणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत. जिल्हा नियोजनमधून निधी घेणाऱ्या प्रत्येक शासकीय कार्यालयाने आपल्या इमारतीचे सौरऊर्जाकरण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी २२ विभागांच्या १०० दिवस कृती कार्यक्रम आराखड्याचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली होती, यावेळी त्यांनी हे निर्देश दिले आहेत. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे मंत्री, राज्यमंत्री, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**काय आहे जिओ टॅगिंग ?**

महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटरच्या भागीदारीत, राज्यातील सर्व शाळांसाठी एक व्यापक जिओ-टॅगिंग प्रकल्प सुरू करणार आहे. या उपक्रमात प्रत्येक शाळेचे अचूक अक्षांश आणि रेखांश मॅप केले जातील. ज्यामुळे धोरण तयार करण्यास आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी एक तपशीलवार डेटाबेस उपलब्ध होईल.

जिओ-टॅगिंग प्रकल्प हा डेटा संकलन सुलभ करण्यासाठी आणि शालेय पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी सरकारच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे. या प्रकल्पाद्वारे गोळा केलेली माहिती एकत्रित केली जाईल आणि UDISE Plus पोर्टलवर उपलब्ध करुन दिली जाईल, जो एक राष्ट्रीय व्यासपीठ आहे जो शाळांच्या विविध पैलूंवर, ज्यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या, पायाभूत सुविधा आणि सुविधांचा समावेश आहे, महत्त्वाचे अंतर्दृष्टी प्रदान करतो.

# आनंदी पहाट...





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

ज्योतिर्मय साहित्य

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.

## अनोखे अंदमान – भाग १



उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

मी लोकसत्ता दैनिकात अंदमान यात्रेची जाहिरात पाहिली पुणे येथील श्री आनंद दवे हे अंदमानला सहल घेऊन जाणार होते. त्यांच्यासोबत आम्ही जाण्याचे ठरवले मी माझी पत्नी सौ श्रद्धा, माझे व्याही श्री आणि सौ दिंडोकार, सौ श्रद्धाची मोठी बहीण श्रीमती जयाताई मैराळ अशा पाच जणांची नाव नोंदणी आम्ही श्री आनंद दवे यांच्याकडे केली. आमच्या सोबत या सहलीमध्ये श्री आनंद दवे यांच्यासह एकूण २९ जणांचा सहभाग होता.

२० फेब्रुवारी २०२५ रोजी आम्ही पुणे येथून आमच्या प्रवासाला सुरुवात केली. आमचा प्रवास रात्रीचाच होता. विमान प्रवास दोन टप्प्यात होता आधी आम्ही चेन्नईला पोहोचणार होतो आणि तिथून दुसऱ्या विमानाने पोर्ट ब्लेअरला. चेन्नई विमानतळावर उतरल्यानंतर आम्हाला काही तास पुढील विमानाची वाट पहावी लागली आणि चेन्नई येथून पहाटे पुढील विमानाने आम्ही पोट ब्लेअरला रवाना झालो.




पोर्ट ब्लेअरला पोहोचेपर्यंत छान उजाडले होते. समुद्रावरून आमचे विमान जात होते. खिडकीतून खाली पाहिल्यानंतर अंदमान बेटांची लांब रांग दिसत होती. सकाळी बरोबर साडेसात वाजता आमचे विमान अंदमानच्या पवित्र भूमीवर उतरले. अंदमानचे विमानतळ छोटे परंतु सुंदर आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हवाई अड्डा असे या विमानतळाचे नाव आहे आम्ही आमचे सामान घेऊन बाहेर पडलो तर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा भव्य पुतळा नजरेस पडला. या भूमीवर त्यांच्या झालेल्या या प्रथमदर्शनाने मनाला धन्य वाटले. त्यांना वंदन केले. आम्हाला घेण्यासाठी तेथील प्रेम या नावाचा नियोजित प्रतिनिधी विमानतळावर हजर होता. त्याच्याबरोबर आम्ही हॉटेल ब्ल्यू सी मध्ये पोहोचलो.

आमची बाकीची मंडळी अजून यायची होती. त्यांचे विमान हैदराबादहून येणार होते. ते सकाळी साडेनऊ वाजता पोहोचणार होते. तोपर्यंत आम्ही फ्रेश होऊन चहा नाश्ता घेतला आणि विश्रांती घेतली. दुपारच्या जेवणानंतर तीन वाजता आम्ही अंदमान येथील सेल्युलर जेल ला भेट देण्यासाठी निघालो. ( क्रमशः )

# दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## पढत मूर्ख लक्षण

ज्योतिर्मय साहित्य

यासाठी आपणा सर्वांना महिती असलेले कोळी, माशी, हत्ती, कमळ, मुंगीचे ऊदा समर्थ देतात. स्त्रियांच्या संगतीत रमतो, प्रत्येकाला ब्रम्हज्ञान सांगत बसतो, दारू सारख्या निंद पदार्थीचे सेवन करतो. वाईट आचरणाने वागतो. मी म्हणजेच देह अशी खोटी भावना अंगिकारणारा, अती लोभापायी भगवंताशी मैत्री न करणारा, आपमतलबी, स्त्रियांच्या अवयवांचे वर्णन करणारा, त्यांची नाना सोंग घेणारा, भगवंताला विसरून फाजील पणात जगणारा, ऐश्वर्य असेल तर त्याच्या मनामधे घमेंड येते, सर्व जीव मात्रांना विसरतो. त्यांना हीन समजतो, शास्त्रविरोधी मतांचे प्रतिपादन करतो. त्यांना आधार देतो,

जो कोणी विद्वा विरक्त आहेत ब्रम्हज्ञानी आहे, महायोगी हे ऐवढे अधिकार हातात असताना लोकांना खोटे भविष्य सांगत सुटतो. तो पढतमुर्ख होय.समाजाला खंबीर बलशाली कणखर अशा लोकांची गरज असताना, अशी विचारधारा असताना समाजाला सन्मार्गाला लावायचे सोडून नको त्या गोष्टींची पाठराखण करतो,समाजात बेबंदशाही माजवतो तो पढतमुर्ख होय.ज्याने कधीच भक्ती मार्गाचा अवलंब केला नाही .वैराग्य, भजनपूजन न करता लोकांना मात्र ब्रम्हज्ञानसांगतो तो पढतमुर्ख होय. तिर्थक्षेत्र,वेदशास्त्र,भजनपुजन या सर्वांना कर्मठपणा समजून त्याग करतो अपवित्र भ्रष्ट आचरणाने वागतो. ज्याची योग्यता नाही त्याची स्तुती करतो. एखाद्याची तोंडावर स्तुती करायची व पाठ फिरली की त्याच्यावर शिव्यांची लाखोळी वहायची. गुरूंचा अनादर करायचा. ज्ञानाच्या मोठमोठ्या बाता सांगत बसतो दुसऱ्याला चांगले वागण्यास सांगतो पण स्वतः दुष्कर्म करतो. अनाचाराने अवैधरित्या धन संपत्ती जमा करतो. पैसा मिळवण्यासाठी स्वार्थीपणाने परमार्थाचा वापर करतो. स्वतः ब्रम्हज्ञानी नसुनही लोकांना ब्रम्हज्ञान पेरण्याचा खटाटोप करतो. परमार्थाच्या नावाखाली देवाधर्माच्या नावावर जो भ्रष्टाचार, अनाचार,अनागोंदी कारभार करतो.प्रपंच अशाश्वत म्हणून त्याच्याकडे पण नीट लक्ष दिले नाही. परमार्थ खोटा मानला म्हणून तो केला नाही. सतत देवाब्राम्हणांचा द्वेश करून सतत नकारात्मक विचारात गढून जातो तो पढतमुर्ख होय.

समर्थानी ऐकुण ४१ ओव्यामध्ये पढतमुर्खाचे वागणे सांगितले आहे मला समजले तसे प्रत्येक ओवी माझ्या कुवतीनुसार मांडण्याचा प्रयत्न केला .

## नामाचे प्रेम का येत नाही?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास.

नामाचे प्रेम येण्याला बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, ‘‘नामाचे प्रेम का येत नाही ?’’ तर तो सांगतो, ‘‘माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल.’’ पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, ‘‘पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही.’’ परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, ‘‘या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;’’ तर कोणी म्हणतो, ‘‘प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;’’ तर कोणी प्रापंचिक दुःखाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल.

नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वतःचे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे.

# संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या ५

ज्योतिर्मय साहित्य

प्राणी बोलू शकत नाहीत. परंतू आपल्या भावना त्यांच्या पद्धतीने नक्कीच व्यक्त करत असतात. जे त्यांच्या संपर्कात असतात, त्यांच्या जवळ असतात त्यांना या गोष्टी समजतात. आणि बरेचदा त्यांच्या कडून आपल्याला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळत असतात. आज अशाच एका समजूतदार बैलाची मी बघितलेली आणि अनुभवलेली काही उदाहरणे सांगणार आहे.

बैलाची प्रतिमा आपल्या मनात खूप वेगळी असते. तो साधारणपणे शेतात बघण्याची सवय असते. पण काही माणसे काही कारणांनी शहरात स्थलांतरित होतात. आणि त्यांच्या बरोबर त्यांच्या जवळचे प्राणी सुद्धा स्थलांतर करतात.

आमच्या घराजवळ असेच एक कुटुंब साधारण ३०/३५ वर्षापूर्वी रहात होते. त्यांच्याकडे एक मोठा धिप्पाड की त्याच्याकडे बघितल्यावर भीती वाटावी असा एक बैल होता. आणि त्याला माणसांची भाषा कळायची. त्याला हैक म्हंटले की कळायचे नाही. पण तिकडे सरक, जा, ये हे शब्द कळायचे. हे मला समजण्यासाठी पण एक दोन कारणे झाली. नाहीतर त्या बैलाकडे कशाला लक्ष देणार?

एकदा मी बसमधून उतरून घरी चालले होते. तर एक बैलगाडी चालकाशिवाय चाललेली दिसली. मी आपली घाबरून कडेकडेने निघाले. तर ती गाडी माझ्या समोरच चालली होती. आम्ही घरापर्यंत बरोबर होतो. ती गाडी माझ्या घरच्या बरीच पुढे जाऊन थांबली. माझी उत्सुकता मला गप्प बसू देत नव्हती. मी पण त्या गाडीच्या मागे गेले. आणि त्या घरात विचारल्यावर समजले, ती गाडी व तो बैल त्याच घरातले होते. तीच गाडी दुसऱ्या वेळेस दिसली. त्यात सिमेंटची पोती होती आणि चालकाशिवाय चालली होती. मी पुन्हा त्या गाडीच्या मागे गेले. तर ती गाडी दुसऱ्याच घरासमोर थांबली. त्या घरातून काही कामगार आले त्यांनी ती पोती उतरवली. आणि बैल ती गाडी घेऊन त्याचा मालक ज्या दुकानात बसला होता तिथे जाऊन पोहोचला.

याच बैलाची स्वारी आमच्या घरासमोर जी मोकळी जागा होती त्यावरचे हिरवळ खाण्यासाठी कायम एका छोट्या झुडुपाला बांधलेली असायची. हे पण नवलच होते. तो गवत खाऊन झाले की तिथेच बसायचा. एकदा हाच बैल आमच्या घरासमोर बसला. तो इतका मोठा होता की घरच्या समोरील सगळा रस्ता त्याने व्यापला होता. त्याला ओलांडून कोणीच जाऊ शकत नव्हते. सगळेच घाबरुन त्याच्या अलीकडे पलिकडे थांबले. तेवढ्यात आमचा चार वर्षाचा मुलगा पाठीवर सॅक, गळ्यात वॉटर बॅग अशा अवतारात आला. आणि बैला जवळ जाऊन म्हणाला, ‘‘इथे रस्त्यात का बसला आहेस? लोक तुला घाबरत आहेत. उठ चल तुझ्या जागेवर.‘‘ असे म्हणून मुलाने त्याची दोरी हातात घेतली. लगेच तो उठला. आणि त्याच्या बरोबर जाऊ लागला. मुलाने त्याला त्या छोट्या झुडुपाजवळ नेले. आणि म्हणाला, ‘‘तुला इथे बांधले आहे. इथून रस्त्यावर जायचे नाही.‘‘ आणि नंतर दिवसभर तो बैल तेथून अजिबात कुठेच गेला नाही.

सगळ्या मोठ्या माणसांनी मुलाला विचारले तू त्याला कसे तिकडे नेलेस? त्यावर मुलाने सांगितले, त्याला माणसांची भाषा कळते. आपण सांगितलेले तो ऐकतो.

मग मात्र मी त्याच्या मालकाला विचारले. त्याने जे सांगितले ते एक वास्तववादी आश्चर्य होते. त्याने सांगितले, ‘‘आम्ही त्याला त्याचा जन्म झाल्या पासून मुलांशी बोलावे तसे बोलतो. त्याला गोष्टी पण सांगतो. त्यामुळे त्याला आपली भाषा समजते.‘‘ त्याने असेही सांगितले, ‘‘मी त्याला घर दाखवतो आणि त्या मालकाचे नाव सांगतो. मग दुकानातून गाडीत समान भरतो आणि कोणाकडे न्यायचे ते सांगतो. आणि तो बरोबर त्या घरासमोर जाऊन थांबतो. आणि समान उतरवले की पुन्हा माझ्याकडे येतो. काही काम नसेल तर त्याला म्हणतो, राजा आपल्या घरी जा. मग तो बरोबर घरासमोर येऊन थांबतो.‘‘ या अनुभवाला खूप वर्षे झाली. नंतर त्याचा मालक वारला. आणि काही दिवसात हा बैल पण वारला. असे म्हणतात, प्राणी मालकाला इतका जीव लावतात की त्यांच्या मागे प्राणी फार जगत नाहीत. आणि हे अनुभव आपण आपल्या पाळीव प्राण्यांचे घेत असतो. असा बैल मात्र माझ्या आयुष्यात मी एकच बघितला. एकूणच सगळे चराचर आपल्याला आश्चर्य करायला लावत असते.

# नीतिशतक निरूपण



अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जाड्यं ह्रीमिति गण्यते व्रतरूचैर्दम्भ: शुचौ कैतवं**
**शूरे निर्घृणता मुनौ विमतिता दैन्यं प्रियालापिनि।**
**तेजस्विन्यवलिप्तता मुखरता वक्तर्यशक्तिः स्थिरे**
**तत् को नाम गुणो भवेत् स गुणिनां यो दुर्जनैर्नाङ्कितः।।**

अर्थ – दुर्जन लोक गुणी जनांच्या लज्जेला मूर्खता, व्रताच्या आवडीला दंभ, शुद्धतेला कपट, शौर्यास निर्घृणता, विचारशीलतेस बुद्धीचा अभाव, सुन्दर अर्थात मधुर वाणीला दीनता, तेजस्वितेला गर्व, वाक्पटुत्वाला मुखरता, स्थिरतेला दुर्बलता असे उल्लिखित करतात. गुणवानाचा असा कोणता गुण असतो, ज्यावर दुर्जनांद्वारे बोट दाखविले जात नाही? अर्थात सज्जनांच्या सर्व गुणांना दुर्जन दोष म्हणूनच प्रस्तुत करीत असतो.

या जगात अशी कोणती वस्तु आहे, जी दुर्जनांना वाईट दिसत नाही? आणि अशी कोणती वस्तु आहे, जी सज्जनांना चांगली दिसत नाही? खरे तर हा फरक सज्जन आणि दुर्जन यांच्या दृष्टिकोनांमधील असतो. दुर्जन लोक सज्जनांच्या प्रत्येक गुणात कशाप्रकारे दोष पाहतात; याचे विवेचन कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकात केले आहे.

# ॥ श्री राम कथा ॥




ज्योतिर्मय साहित्य

रावणाने मारीच्या सीता पळविण्याची योजना सांगितली तू सुवर्ण मृगाचे रूप घेऊन सीतेच्या समोर जा मग ती रामाकडे तुझी मागणी करेल तेव्हा तू पळून पळून जा मग राम तुला बाण मारतील तेव्हा तू रामाच्या आवाजात हितेश लक्ष्मणास हाक दे यानंतर लक्ष्मण जेव्हा सीते पासून दूर होईल तेव्हा मी सीतेला पळविन ही योजना ऐकताच मारीच म्हणाला पती जवळ नसताना त्याची पत्नी पळवणे हा अधर्म होय व हे मी करणार नाही.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

मारीच हरिणाचे रूप घेऊन रामास दूर नेण्यास तयार नव्हता. रावण म्हणाला तुला जावे लागेल, ही आज्ञा आहे. नसता, तुला मी मारील. मग मारीचं विचार करतो रावण हाते मरून नरकात जाण्या पेक्षा रामाच्या हस्ते मरून मोक्ष तरी मिळेल. मृत्यू तर कसाही येणारच आहे.मग मोक्ष निवडा हा विचार त्याने केला.

विचार मध्ये विच हा धातू आहे म्हणजे निवडणे. कांहीं त्यागून कांहीं निवडणे हा विचार असतो.

आपली संस्कृती फार महान आहे. भावा बरोबर आपले वर्तन कसे असावे, आई वडिलांबरोबर ते कसे वर्तन असावे या साठी रामायण वाचावे. प्रतिकूल परिस्थितीचा अनुकूल बुद्धीने कसा विचार करावा हे रामायण शिकविते. कैकयीला दोष देऊ नका असे राम म्हणाले. कारण ती फार बुद्धिमान आहे कारण सोन्याचे हरिण नसतेच हेही ज्याला कळत नाही तो अडाणी, राना वनात राहण्यास योग्य म्हणून मला वनात जायला लावले. हे तिला समजले म्हणून ती हुशार आहे. हे हनुमान रामायणात लिहिले आहे.

क्रमशः

# आरोग्य संजीवनी




## लिंबुच्या पानांचे आहेत एवढे विलक्षण फायदे

ज्योतिर्मय साहित्य

पृथ्वीवर जणू हा रामबाणच.....!

खरतर लिंबाच्या पानांचा आपण वर्षभर उपयोग करू शकतो व त्याचा फायदा घेऊ शकतो. आजच्या आमच्या या माहितीद्वारे आम्ही तुम्हाला या पानांचे खास फायदे सांगणार आहोत जे खूपच औषधी आहेत. हजारो वर्षांपासून याचा प्रयोग केला जात आहे. अनेक आजारांना याच्या मदतीने आपण दूर ठेवू शकतो. आयुर्वेदात याचे खूपच महत्व आहे.

आज आपण लिंबाच्या पानांचे फायदे बघूया. तुमच्या जवळपास ही पाने मिळू शकतात. तुम्ही याचा प्रयोग करू शकतात. आयुर्वेदात माहिती महत्वाची आहे, योग्य प्रमाण खूप महत्वाचे आहे. तरच त्याचा फायदा मिळतो. याच्याबद्दल विस्ताराने जाणून घेऊया.

महत्त्वाचे म्हणजे लिंबाचे पान जर हातात घेऊन ते चुरुन किंवा रगडून त्याचा वास घेतला, तर डोकेदुखीमध्ये आराम पडतो. कोणाला डोकेदुखी, अर्धशिशी, मायग्रेन असेल तर लिंबाच्या पानाचा प्रयोग करून तुम्ही ठीक होऊ शकता. याची पाने हातात रगडून ५ मिनिटे श्वास घ्या, तुम्हाला आराम मिळेल.

ही पाने तुमच्या चेहर्यावरील डाग, खड्डे, मुरूमे दूर करण्यासाठी फायदेमंद आहेत. ही खूपच दिव्य अशी औषधी आहे. याची पाने घ्या, छोटी ५ ते ६ पाने घ्या, ती वाटून घ्या व त्यात मध मिसळून चेहर्यावर लावा. दिवसातून एकदा हा प्रयोग करून बघा, चेहर्यावरील सुरकुत्या, डाग, मुरूमे दूर होतील व चेहरा चमकदार होईल.

लिंबाच्या पानांचे खूप फायदे आहेत. कोणाला त्वचारोग असेल, खाज, खरूज, नायटा, फोड असेल, तर ते दूर करण्यासाठी लिंबाची पाने खूपच उत्तम असे औषध आहे. त्या साठी एक साधा प्रयोग करून बघा. पाने वाटून त्याची पेस्ट बनवा, त्यात थोडा कापुर व कडुनिंबाचे तेल मिसळा. एक चिमुट हळद घाला. सगळे व्यवस्थित मिसळा व जिथे तुम्हाला खाज, खरूज, नायटा असेल त्याजागी ही पेस्ट लावा. कोणत्याही प्रकारच्या त्वचारोगात ह्याचा लेप खूपच फायदेशीर आहे. त्वचारोग नाहीसा होतो, खूपच दिव्य औषध आहे हे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

केसांमधील कोंडा नाहीसा करण्यासाठी पण याचा उपयोग होतो. पाने वाटून पेस्ट बनवून केसांच्या मुळाशी लावून हलक्या हाताने मालीश करा. १ ते २ वेळा लावल्यामुळे केसातील कोंडा नाहीसा होतो.

पोटात जंत झाले असतील, साधारण लहान मुलांच्या बाबतीत जर पोटात जंत झाले, तर लिंबाच्या पानांचा ५ मिली रस घेऊन त्यात हलका मध घालून मुलाला पाजा, त्याच्या पोटातील जंत मरतील या रसाने. मोठ्या माणसासाठी १० मिली रस जरूरी आहे.

कावीळ झाली असेल, तर त्यासाठी पानांचा १० मिली रस काढून तो ताकात मिसळून त्याचे सेवन करा. १० ते १२ दिवस हे घेतले तर कावीळ ठीक होते. हा काविळीसाठी रामबाण उपाय आहे.

पोटातील कोणत्याही समस्येवर म्हणजेच गॅस, पोटदुखी, बद्धकोष्टता यावर हा उपाय प्रभावी आहे.

खरंतर सर्वांन माहीत आहे लिंबू खाण्याचे किती फायदे आहेत त्याचप्रमाणे याची पाने सुद्धा खूपच फायदेशीर आहेत. याच्या पानांचा काढा रक्त शुद्ध करतो. पाने घालून चहा बनवून घेऊ शकता.

***

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

तारापद म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा एक मनमौजी मुलगा. तो बोटीवरील सगळ्यांचीच मने जिंकून घेतो. त्याला संगीताची आवड आहे. त्याचा आवाज उत्तम आहे. त्याला स्वयंपाक करणे, खरेदी करणे इथपासून ते बोट चालवणे आदी कौशल्ये सहज जमतात. अन्नपूर्णा तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे एवढ्या आकर्षित होतात की त्याला पाहून त्यांच्यातील वात्सल्यभाव जागृत होतो. त्याला कसे खुश ठेवता येईल याचा प्रयत्न त्या करतात. त्या त्याला त्याचा भूतकाळ किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी विचारतात पण त्याबद्दल तो फारसे बोलत नाही. त्याच्या आईला चार मुलगे आणि तीन मुली आहेत. तसा तो घरातही सगळ्यांचा लाडका असतो. पण एकाच ठिकाणी अडकून पडणे वा बंधनात राहणे हा त्याचा स्वभाव नाही. त्यामुळे तो दोन तीन वेळा घरातून पळून गेला आहे.

रवींद्रनाथांच्या इतर कथांप्रमाणेच या कथेलाही निसर्गाची सुंदर पार्श्वभूमी लाभली आहे. पावसाळी नदी, हिरवीगार कुरणे, गाणारे पक्षी आदी निसर्गाचे घटक कथेबरोबर साथसंगत करतात. तारापद या निसर्गाच्या सहवासातच रमून जातो. वाटेत नंदीग्राम गाव केव्हा निघून जाते ते कळत नाही. जमीनदार त्याला आपल्यासोबत आपल्या गावी घेऊन जातात. तिथे तो दोन वर्षे राहतो आणि थोड्याच कालावधीत सगळ्या गावकऱ्यांची सुद्धा मने जिंकून घेतो.



## जात्यावरच्या ओव्या......

### नातेसंबंध - मायलेकी

*नांद नांद बया,*
*नको लावू खाली पाह्या*
*सभेमध्ये शिलेदार*
*तुझा ऊभा भाऊराया ||१५||*

*बापाने दिली लेक*
*नाही पाहिला जावई,*
*कसायाच्या दारी*
*लेक बांधली हवाई ||१६||*

**संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे**
**संकलन : सौ मनोरमा बोराडे**

# आनंद रामायणातील श्रीरामाष्टक

**ज्योतिर्मय साहित्य**

राम कथा गिरिजा मैं बरनी। कलि मल समनि मनोमल हरनी।।संसृति रोग सजीवन मूरी। राम कथा गावहिं श्रुति सूरी।।

अर्थात भगवान श्री शंकर पार्वतीमातेस म्हणतात की, ''हे गिरिजे, कलियुगाच्या पापांचा नाश करणारी, मनाचे मळभ दूर करणारी अशी पतितपावनी रामकथा मी वर्णिली. ही रामकथा जन्म-जरा-मरण या रोगासाठी संजीवनी वनस्पतीप्रमाणे आहे, असे वेद आणि विद्वज्जन सांगतात.

असे मनोरम वर्णन श्रीरामकथेचे करण्यात येते.

पुण्यं पापहरं सदा शिवकरं विज्ञानभक्तिप्रदं।मायामोहमलापहं सुविमलं प्रेमाम्बुपूरं शुभम्।श्रीमद्रामचरित्रमानसमिदं भक्त्यावगाहन्ति येते संसारपतंगघोरकिरणैर्दह्यन्ति नो मानवाः।।

श्रीरामचरित्ररूपी मानसाची महती या नितांत सुंदर अशा श्लोकात सांगितली आहे. हे श्री रामचरितमानस पुण्यरूप आहे. पापांचे हरण करणारे आहे. नित्य कल्याणकारी आहे. विज्ञान आणि भक्ती देणारे आहे. माया-मोह-मल दूर करणारे आहे. परम निर्मलरूपी जलाने परिपूर्ण आणि मंगलमय असे आहे. जो मनुष्य भक्तिपूर्वक या मानससरोवरामध्ये निमज्जन करतो, त्याला संसाररूपी सूर्याची प्रचंड किरणे जाळीत नाहीत. असे थोर महात्म्य श्रीरामकथेचे आहे.

यावत् स्थास्यन्ति गिरयस्सरितश्च महीतले ।तावद्रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति ।।
वाल्मीकिरामायणम् १.२.३६

जो पर्यंत या भूतलावर पर्वत आहेत, नद्या आहेत, अर्थात जो पर्यंत ही सृष्टी आहे, तो पर्यंत या रामायणकथेचा लोकांमध्ये प्रचार होत राहील.

असे वर्णन श्रीवाल्मीकीरामायणात देखील मिळते.

संस्कृत, हिंदी, मराठी या भाषेतील अनेक काव्ये ही रामायणावर आधारित आहेत. रामायणाची साहित्यिक उपजीव्यता अद्वितीय अशा प्रकारची आहे.

समर्थ श्री रामदास स्वामी, श्रीधरस्वामी, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज अशा अनेक साधू संतांनी मराठीभाषेतून रामायणाची, रामनामाची महती सांगितली आहे. श्रीराम कथेतील तत्त्व हे नित्य अशा प्रकारचे आहे. त्याची मांडणी कालानुरूप होणे आवश्यक असते. आणि तशी ती प्रभू रामरायांच्या कृपेने झाल्याचे दिसून येते. संत तुलसीदास यांचे नंतर देखील हिंदीतही ती मालिका सुरूच राहिली. राष्ट्रकवी मैथिलीशरण यांनीही आधुनिक काळात काव्याच्या



माध्यमातून राम कथा गायिली आहे.

रामायणाच्या या मालिकेत आनंद रामायण देखील प्रसिद्ध आहे. प्रस्तुत रामायणात भगवान श्रीरामाचे नितांत सुंदर असे अष्टक येते.

।। अथ रामाष्टकम् ।।
श्रीशिव उवाच ।
भगवान श्रीशिवजी म्हणतात-

सुग्रीवमित्रं परमं पवित्रं सीताकलत्रं नवमेघगात्रम् ।
कारुण्यपात्रं शतपत्रनेत्रं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।१।।

सुग्रीवाचे मित्र, परम पवित्र, सीताकांत, नवमेघाप्रमाणे कांती असणारे, कारुण्यनिधी आणि कमलदलाप्रमाणे नेत्र असणारे अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

संसारसारं निगमप्रचारं धर्मावतारं हृतभूमिभारम् ।
सदाविकारं सुखसिन्धुसारं श्रीरामचद्रं सततं नमामि ।।२।।

ज्यांनी भूमीचा भार हरण केला आहे, जे धर्माचे अवतार आहेत, जे अखिल विश्वाचे सार आहेत, ज्यांच्याविषयी वेद कथन करतात, जे सदैव अविकारी आहेत, जे सुखसिंधुचे म्हणजे आनंदसागराचे सार आहेत, अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

लक्ष्मीविलासं जगतां निवासं लङ्काविनाशं भुवनप्रकाशम् ।
भूदेववासं शरदिन्दुहासं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।३।।

लक्ष्मीपती, अखिल विश्वामध्ये भरून राहणारे, लंकेचा नाश करणारे, जगाला आनंदित करणारे, संतांच्या द्वारे ज्यांचे ध्यान केले जाते, शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे हास्य असणारे अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

मन्दारमालं वचने रसालं गुणैर्विशालं हतसप्ततालम् ।
क्रव्यादकालं सुरलोकपालं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।४।।

मंदार पुष्पांची माळा धारण करणारे, रसपूर्ण वाणीचे उच्चारण करणारे, गुणांनी विशाल असणारे, एका बाणात सप्त ताल वृक्ष छेदणारे अर्थात सर्वश्रेष्ठ धनुर्धर, असुरान्तक, देवांचे रक्षणकर्ते, अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.



शब्दांकन
सौ. मानसी चं. सोनपेठकर

वेदान्तगानं सकलैः समानं हतारिमानं त्रिदशप्रधानम् ।
गजेन्द्रयानं विगतावसानं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।५।।

उपनिषदे ज्यांची स्तुती गातात, जे सर्वांना समानतेने वागवितात, ज्यांनी शत्रूचे गर्वहरण केले आहे, देवांचे मुख्य असे, गजेंद्राधिरूढ, अभयदान देणारे, अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

श्यामाभिरामं नयनाभिरामं गुणाभिरामं वचनाभिरामम् ।
विश्वप्रणामं कृतभक्तकामं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।६।।

मेघःश्यामल अशी सुंदर कांती असणारे, नयनरम्य रूप असणारे, गुणांचे निधान असणारे, सुंदर म्हणजे मधुर, रसाळ, पवित्र आणि सत्य वचन बोलणारे, ज्यांचेसमोर अखिल विश्व नतमस्तक होते, भक्तांची कामना पूर्ण करणारे, अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

लीलाशरीरं रणरङ्गधीरं विश्वैकसारं रघुवंशहारम् ।
गम्भीरनादं जितसर्ववादं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।७।।

लीलाशरीरधारी अर्थात अवतारी, युद्धात सदैव विजयी, विश्वाचे सार, रघुवंशाचे मेरुमणी, प्रगल्भ ध्वनी असणारे, सर्व युद्धात विजयश्री प्राप्त करणारे, अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

खले कृतान्तं स्वजने विनीतं सामोपगीतं मनसा प्रतीतम् ।
रागेण गीतं वचनादतीतं श्रीरामचन्द्रं सततं नमामि ।।८।।

दुष्टनिर्दालक, स्वजनांप्रति विनयी, सामोपगीत असे मनाला प्रतीत होणारे, प्रेमाने ज्यांची स्तुती गायिली जाते असे वचनांच्या द्वारे अवर्णनीय असे ज्यांचे महात्म्य आहे, अशा श्रीरामचंद्रांना मी सतत नमस्कार करतो.

श्रीरामचन्द्रस्य वराष्टकं त्वां मयेरितं देवि मनोहरं ये ।
पठन्ति शृण्वन्ति गृणन्ति भक्त्या ते स्वीयकामान् प्रलभन्ति नित्यम् ।।९।।

हे देवी, श्रीरामचंद्रांचे श्रेष्ठ असे हे मनोहारी अष्टक मी तुला सांगितले आहे. जे लोक भक्तीपूर्वक हे अष्टक वाचतात, ऐकतात, गातात त्यांची सर्व मनोरथे नित्य सफल होतात.

।। इति शतकोटिरामचरितान्तर्गते श्रीमदानन्दरामायणे वाल्मीकीये सारकाण्डे युद्धचरिते द्वादशसर्गान्तर्गतं श्रीरामाष्टकं समाप्तम् ।।

अशा प्रकारे शतकोटीरामचरितामधील श्रीमद् आनंद रामायणातील वाल्मीकीय सारकांडातील युद्धचरितातील द्वादश सर्गातील श्रीरामाष्टक आहे.

एकूणच आनंद रामायणातील नितांत सुंदर असे हे श्रीरामाष्टक आहे. याचे काही पाठभेद देखील असण्याची शक्यता आहे. बहुतेक ठिकाणी हे अष्टक संस्कृतात उपलब्ध आहे. आधुनिक केसरीच्या वाचकांसाठी मराठी अनुवाद देण्याचा प्रयत्न केला आहे. जर काही त्रुटी असतील, तर अभयदान आणि शरणदान देण्यासाठी ज्यांची विशेष ख्याती आहे, असे लोकप्रभू श्रीरामराय क्षमा करतील आणि झालेली सेवा गोड मानून घेतील, अशी श्रद्धा आहे.

इति लेखनसीमा

**आनंद रामायणातील श्रीरामाष्टक**
**ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर**

# आठवणी - एक अद्भुत मेमरी बुक

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रत्येकाकडे देवाने आठवणीचे एक पर्सनल फोल्डर दिलेले आहे ते सर्वांसाठी जगण्यास खूप महत्वाचे आहे.प्रत्येक जण जन्मल्यानंतर त्याला जेंव्हा पासून कळायला लागते तेंव्हापासून आपल्या आठवणी आपल्या मेमरीत साठवायला सुरुवात होती. आपला मेंदू हा एक मोठी हार्ड डिस्कच असते त्यामध्ये अगदी जन्मल्यापासून सर्व घटना साठवलेल्या असतात, आपल्याला त्या कधीही वाटेल तेंव्हा मेंदूला ऑर्डर दिली की तो ती घटना आपल्याला दाखवतो. खरंच हे सर्व अद्भुत आहे ना, पण खरंच आठवणी या आयुष्यात किती महत्वाच्या आहेत नाही, मग त्या चांगल्या असो किंवा वाईट. जगण्यासाठी त्या आवश्यक आहेतच नाहीतर जगणे खूप अवघड होऊन बसले असते. आपल्या आयुष्यात अनेक व्यक्ती येतात आणि निघून जातात पण त्यांच्या आठवणी आपल्या स्मरणात कायम घर करून जातात. आपण बघतो कित्येक लोकं फक्त आठवणीवर जगत असतात, यावरून आपल्या लक्षात येते की जगण्यास फक्त एक आठवण ही पुरेसी असते.

आपल्या आयुष्यात आठवणींना खूप महत्व आहे, आठवणी आपल्या आयुष्याचा एक महत्वाचा भाग आहे. आपण आनंदात आठवणी शोधतो, तसेच आपण दुःखातही आठवणी शोधतो, आपण अडचणीत असेल तेंव्हाही आपण अनेक प्रसंग आठवतो व त्या आठवणीतून या अडचणीच्या प्रसंगाना तोंड देतो. आठवणींतून खूप काही शिकायला मिळते, आपण अनेक प्रसंगाना कॅमेऱ्यात टिपतो व त्या आठवणी आपण भविष्यात कधीही उघडून बघतो व त्या त्या प्रसंगात स्वतःला काही



क्षणासाठी घेऊन जातो. तसेच आठवणी या आयुष्याचा कॅमेरा आहे ज्यात आपल्या सर्व आयुष्याचे सार साठवून ठेवलेले आहे. आठवण एका क्षणात आपल्याला वेगळ्या विश्वात घेऊन जाते. आपण लहानपणी केलेल्या खोड्या, तसेच आयुष्यात अनेकदा अनेक गंमतीदार प्रसंगातून घडलेल्या घटना नंतर आपल्याला पुढील आयुष्यात सुख देऊन जातात. अनेकदा आपल्या हातातून नकळत चुका झालेल्या असतात, अनेकदा सहजपणे आपण खूप चांगले कामं करून गेलेलो असतो असे प्रसंग आठवले की आपल्याला त्याची नंतर खूप गंमत वाटते. खरंच आयुष्य हे अगणित घटना, प्रसंगांनी भरलेले असते व ते आपल्याला आठवणरुपी परत परत बघता येते ही देवानी मनुष्याला दिलेली खूप बहुमोल देणगीच म्हणावी लागेल नाही का.



संजय व्यापारी
७७४३९१८५५९

## दवा-खाना

# जब दवा ही दर्द बन जाए

**ज्योतिर्मय साहित्य**

मागील भागात चर्चा केली होती त्याचाच पुढील मतितार्थ असा की वैद्यकीय प्रतिनिधी अर्थात मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह (एम. आर.) औषध कंपन्यांच्या मार्केटिंग (विपणन) चा एक अविभाज्य भाग आहे यात शंकाच नाही. याबाबत जागतिक आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या नीतिनियमांनुसार डॉक्टरांनी एम. आर. कडून नवीन औषधांबद्दल दिलेली माहिती शांतपणे नक्कीच ऐकावी, प्रश्न विचारावेत आणि जिथे शंका असेल तिथे स्पष्टीकरण मागावे. औषध कंपन्या देखील अतिघातक औषधांना बाजारात आणत नाहीत. मात्र याला अपवाद म्हणजे कॅन्सर आणि एच आय व्ही- एड्स सारखे जीवघेणे रोग. यांच्यावर अजूनही १०० टक्के प्रभावी औषधे नाहीत. त्यामुळ या रोगांवर प्रभावी अशी नवीन औषधे असल्यास त्यांचा रुग्णावर सकारात्मक परिणाम आणि त्यांचे घातक परिणाम यांचा सारासार विचार करून त्यांना बाजारात आणण्यासाठी परवानगी दिली जाते. मात्र व्हिटॅमिन, मिनरल, टॉनिक इत्यादी मी पण आले रे' या वर्गात मोडणाऱ्या औषधांविषयी काटेकोरपणे तपास व्हायला हवा.

मंडळी, गोजिरवाण्या बाळाचे कोडकौतुक तो जसजसा मोठा होतो तसतसे आटत जाते. तद्वतच प्रतिजैविकांच्या सुखकर प्रवासात विघ्ने यायला वेळ लागला नाही. पेनिसिलीनच्या इंजेक्शनचा वापर जसजसा वाढत गेला तसतशी त्याच्या प्रतिकूल परिणामांची देखील जाणीव व्हायला लागली. या औषधामुळे अत्यंत तीव्र अशी ऍलर्जी (ऍनाफिलेक्सिस) होत असल्याचे आढळून आले. या गंभीर प्रतिकूल परिणामाचे अत्यल्प प्रमाण होते ५००००-१००००० त १. यात श्वासनलिकांचे तीव्र आकुंचन झाल्याने रोगी दगावण्याची शक्यता अगदीच धूसर असली तरी होती हे सत्य होते. पेनिसिलीन इंजेक्शनसारखे गुणकारी औषध याच कारणाने मागे पडले. या दुष्परिणामाची खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी तसेच सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांनी भयंकर धास्ती घेतली होती. लहानश्या डोजद्वारे त्वचेवर ऍलर्जी टेस्ट करणे, रोग्याकडून ऍलर्जीचा इतिहास जाणून घेणे इत्यादी मार्ग होते, पण ते १००% खात्रीलायक नव्हते. त्यातच पर्यायी प्रतिजैविके उपलब्ध झाली. यामुळे डॉक्टर मंडळी पेनिसिलिनच्या वाटेला जाईनाशी झाली. मात्र योग्य रीतीने वापर केल्यास हे औषध अजूनही गुणकारी आहे असे मला वाटते.




रस्त्यावर गाडी चालवतांना जीवघेणे अपघात होतात. पादचाऱ्यांसाठी या भयंकर वेगाने धावणाऱ्या गाड्यांनी 'मृत्यूदात्याची' भूमिका निगुतीने निभावलीय! पायी चालणारे जीव मुठीत धरून रस्त्याचे नियम पाळीत चालत असतात, या उलट गाड्यांचा वेग अजून वर्धमान करीत बेधुंद चालक गाड्या पळवत आहेतच. औषधांचेही तसेच आहे. डॉक्टरांनी ते देण्याचे सर्व नियम काटेकोरपणे पाळले असूनही वर सांगितलेला अतिदुर्मिळ घातक परिणाम झाला तर त्याला डॉक्टर कसा जबाबदार असेल? असे प्रतिकूल परिणाम झाल्यास त्या संबंधित औषधाच्या संपूर्ण बॅचची गुणवत्ता तपासणे सरकारी नियमांनुसार अनिवार्य असते. यावर सरकारी पातळी, न्यायालय आणि प्रसारण माध्यमांच्या स्तरावर बराच उहापोह झालाय आणि होत राहील.

मंडळी, अजून खोलात जायचे तर एक उदाहरण देते. आपण एखाद्या व्यक्तीचा मित्र म्हणून स्वीकार करतो तेव्हा तिला गुणदोषांसकट स्वीकारतो. तसेच औषधांचे आहे. त्यांची संरचना अशी असते की त्यांचे प्रभावी परिणाम आणि कांही दुष्परिणाम याच संरचनेमुळे होतात. ती बदलली तर दोन्ही गायब ! म्हणूनच आधुनिक औषधांविषयी गमतीने असे म्हटले जाते की ज्या औषधाचे कांहीच अनिष्ट परिणाम नसतात त्याचे इष्ट परिणाम देखील शून्य असतात. गोंडस बाळाला दृष्ट लागू नये म्हणून आई मायेने इवलीशी काळी तीट लावते तसे हे थोडेफार प्रतिकूल परिणाम असल्यास ते डॉक्टरांनी आणि रुग्णाने स्वीकारावे असे मला वाटते. या अपेक्षित परिणामांचा अजून एक उपयोग म्हणजे पेशंट औषध व्यवस्थित घेतोय याची डॉक्टरांना खात्री पटते. अर्थात यात कुठल्याही औषधाचे रोगनिवारक परिणाम आणि घातक परिणाम यांचे संतुलन काटेकोरपणे बघूनच औषधोपचार करणे हे डॉक्टरांचे आद्य कर्तव्य आहे, किंबहुना याचे शिक्षण त्यांना सातत्याने दिले जावे ही अपेक्षा. औषधांच्या जीवनप्रवासात जिथे घातक परिणाम अधिक जाणवतील अशा कुठल्याही टप्प्यावर ते औषध बाजारातून बाद केल्या जाते. ही प्रक्रिया अनवरत सुरु असते.

यावरच अधिक चर्चा पुढील भागांत!



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

# ॥ सत्संगाचा सुगंध राम ॥

**ज्योतिर्मय साहित्य**

चैत्र शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला साजरी होणारी रामनवमी केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच महत्त्वाची नाही तर सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. प्रभू श्रीराम आपल्याला नेहमीच सत्य, न्याय आणि धर्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र हे आपल्या भारतीय संस्कृती आधारस्तंभ आहेत. प्रत्येकाच्या हृदयात ते विराजमान आहेत. त्यांचे जीवन म्हणजे संपूर्ण राष्ट्राला त्यांनी जगण्याचा मार्ग दाखवलेला आहे. संसारात राहून सामाजिक, नैतिक, कौटुंबिक, आणि राजकीय मर्यादा पाळून पुरुष सदाचरणी राहू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू श्री रामचंद्र.

हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यात चैत्र शुध्द नवमीस प्रभू रामाचा जन्म झाला.त्या दिवशी सर्व ठिकाणी रामनवमीचा सोहळा उत्साहात साजरा केला जातो.मंदीरांना रंगरंगोटी केली जाते.समोर. सभा मंडप उभारले जातात.रंगीबेरंगी पताका लावल्या जातात. विद्युत रोषणाई केली जाते.संपूर्ण देशभरात रामनवमी उत्साहात साजरी केली जाते. अयोध्ये पासून ते रामेश्वर पर्यंत हा सोहोळा साजरा होतो.आपल्या संस्कृतीत हा दिवस अतिशय महत्वाचा मानला जातो.

माध्यान्य काळी सुर्य डोक्यावर येतो तेव्हा ठीक बारा वाजता राम जन्माचा सोहळा साजरा करतात. त्याआधी रामजन्मावर आधारित कीर्तन, प्रवचन होते.ते बरोब्बर बारा वाजता संपताच, गुलाल उधळून, जयजयकार केला जातो,वाजंत्री वाजते. फटाके फोडले जातात.बत्ताशांची उधळण होते. हा प्रसाद मिळवण्यासाठी हजारो भाविक गर्दी करतात. पाळणा हलवला जातो. काही ठिकाणी जन्माचा पाळणाही म्हणतात. रामाची आरती करुन, बत्तासा, सुंठ धणे गुळाचा प्रसाद सुंठ वडा, (त्याला पंजिरी, म्हणतात) वाटला जातो.

रामनवमीच्या उत्सवाची सुरूवात काही मंदिरात गुढीपाडव्या पासून होते, तर काही मंदिरात रामनवमी पासून पुढे आठ दिवस कार्यक्रम होतात. या काळात नैमित्तिक भजन, कीर्तन, प्रवचनाचे कार्यक्रम असतात. काही विशेष कीर्तनकारांची, प्रवचनकारांचे,कार्यक्रमांचेही खास आयोजन केले जाते. गीत रामायणकार ग.दी.माडगूळकर, आणि गायक सुधीर फडके (बाबूजी) यांनी गीतरामायण हा कार्यक्रम अजरामर केला. गीत रुपाने रामायणातील प्रसंग त्यानी आपल्या गीतातून डोळ्यासमोर उभे केलेत. अनेक ठिकाणी गीतररामायणाचे कार्यक्रमाच आयोजन आठवडाभर केल जात.श्रोते मंडळींना ह्या काळात ही खास मेजवानीच असते.

श्रीरामास भगवान श्री विष्णूचा सातवा अवतार समजला जातो. देवता आणि अवतार यांच्या जन्मदिवशी त्यांचे तत्व भूतलावर अधिक प्रमाणात कार्यरत असते.श्री रामही अवतारी देवता असल्यामुळे श्रीराम नवमीला श्रीराम तत्व हे हजार पटीने कार्यरत असल्याचे मानले जाते.म्हणून ह्यादिवशी श्रीरामरक्षा पाठ, श्रीराम जय राम जय जय राम.ह्या मंत्राचा जप, केल्याने अधिक पटीने लाभ मिळत असतो. म्हणून अनेक मंदिरात राम नाम जपाची बारी लावून अखंड जप केला जात असल्याचे दिसते. गुढीपाडवा ते रामनवमी ह्या काळात दररोज १३ वेळा रामरक्षा स्तोत्र श्रद्धापूर्वक म्हटल्यावर ते सिद्ध होते. रामरक्षेत प्रत्येक अवयवांचेसाठी स्वतंत्र श्लोक आहे.त्यामुळे त्या त्या अवयवांचे विकार बरे होतात..

राम रक्षा पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथित्मजः ।।
कौसल्येयो दृशौपातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।
जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितनः ।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ।।
करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजितः ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभि जाम्बवदाश्रयः ।।
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
उरु रघुत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ।।
जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखान्तकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोखिलं वपुः ।।



असे कवच या रामरक्षा स्तोत्रात आलेले आहे. कवच म्हणजे आपल्या प्रत्येक अवयवाचे रक्षण करण्यासाठी मंत्र धारण करणे.

पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ।।

पाताळ भूमी आणि आकाश या तिन्ही लोकांत संचार करणारे छद्मचारिणः म्हणजे राक्षस राम नावाने रक्षलेल्या लोकांकडे नजर वर उचलून पाहू शकत नाही.

म्हणूनच रामरक्षा,। रामस्तुतीचे पठण,. हनुमानाचे हनुमान चालीसा पठण, राम नामाचा जप, रामचरितमानसाचे पठण,. केल्याने संकट निवारण होते दुःखापासून मुक्ती मिळते मनोकामना पूर्ण होतात सुख-समृद्धी होते.

रामरामेति रामेति
रमे रामे मनोरमे ।
सहस्त्रनाम तत्तुल्यं
रामनाम वरानने ।।



दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

उत्सव काळात मंदिरातील मूर्तीला, विविध प्रकारचे पोषाख, फुलांचे हार चढवले जातात. तसेच ह्याच काळात काही शहरात एक दिवस रथयात्रेच आयोजन असते.रथातून श्रीरामाची नगर प्रदक्षिणा असते.सकाळी साडेसात -आठ वाजता रथयात्रेस प्रारंभ होतो.रथाला दोर लाउन रथ ओढला जातो.प्रदक्षिणेच्या मार्गावर घराघरातून आरती,(त्याला कानगी म्हणतात. त्यात बत्ताशे, पाच खारका ,आणि संस्थानला देणगी रुपात काही रक्कम असते.) दिली जात असते. आपल्याला त्यांच्याकडून बत्तासे आणि पंजीरीचा प्रसाद मिळतो. उन्हाची पर्वा न करता ढोल-ताशा,लेझीम पथक उत्साहानं लेझीम खेळत असतात. काही ठिकाणी बाहेर गावाहून लेझीम पथक बोलावली असतात.गोफ पथक असतात.संध्याकाळी साडेपाच -सहा वाजता रथयात्रा स्थानी पोहचते. उत्सवाचेच काळात पालखीतूनही श्रीरामाची नगर प्रदक्षिणा होते.

अनेक ठिकाणांच्या उत्सवातून दशावतार(अनेकदा यांना दशावतारी सोंग) काढले जातात. माणंसच मुखवटे धारण करुन नाचतात.प्रत्येक अवतार प्रगट होतांना फटाके फोडले जातात आणि तो अवतार प्रकट होतो.वाद्यांच्या तालावर ते नाचतात. एकेक अवतार साधारणपणे पंधरा-वीस मिनिटे ते अर्धा तास नाचतो. त्यात, मत्स्यावतार,देवी, खंडोबा,नारसिंह, राजा, महिषासुर असे अनेक प्रकार असतात.अनेक वर्षा पासूनची ही प्रथा चालत आली आहे.मध्यरात्री पर्यत हा कार्यक्रम असतो. जळगाव भागात,जळगाव येथे चिमुकले राम मंदिर, जुन्या जळगावातील राममंदिर, जामनेर येथील नगारखाना भागातील राममंदिर,येथे मंत्री गिरीश महाजन यांचे उपस्थितीत कार्यक्रम होतात., शेंदुर्णि येथील राममंदिर, नासिक येथील काळाराम मंदिर, पुण्याच्या तुळशीबागेतील पेशवेकालीन राममंदिर, गोंदवले येथील थोरले व धाकटे राममंदिर , श्री गजानन महाराज संस्थान शेगाव, मुंबई, ठाणे, नागपूर, छ.संभाजी नगर, शिर्डी, आळंदी, अक्कलकोट, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी रामजन्म धूमधडाक्यात साजरा होतो.

सत्संगाचा सुगंध राम, कैवल्याची मुर्ती राम,
चराचरातील स्फुर्ती राम, कर्तव्याचे पालन राम,
सकल सुखाचा सागर राम,आदर्शाचा आदर्श राम,
एकवचनी हा देव महान, अशा अनेक विशेषणांनी प्रभु श्रीरामाचे वर्णन केल आहे.

नैतिक, राजकीय -सामाजिक, कोटुंबिक, मर्यादेच उल्लंघन न होऊ न देता पुरूष उत्तम कसा असतो ह्याच उदाहरण म्हणजे ''मर्यादा पुरुषोत्तम राम''हे आहे.रामाचे संपूर्ण जीवनच मार्गदर्शक स्त्रोत आहे.एक कोटुंबिक आदर्श आहेत.मातृ-पितृ भक्ति अनुकरणिय आहे.

आजही ग्रामीण भागात एकमेकांशी गाठभेट झाल्यास हात जोडून ''रामराम'' म्हणायची पद्धत आहे.तो एक संस्कार आहे.चांगल्या राज्याची संकल्पना म्हणून रामराज्य शब्द प्रचलित आहे...रामराज्य येऊन जनता सुखी होईल अशी नेहमीच आपण सर्व अपेक्षा करत असतो...

प्रभू श्री रामचंद्र एक आदर्श पुरुष तर होतेच तसेच एक बाणी, एक पत्नी, एक वचनी होते. मातृ-पितृ भक्ती, बंधुप्रेम, सत्य वचन, असे अनेक आदर्श गुण त्यांच्यामध्ये होते. ज्या राज्यातील प्रजा अत्यंत सुखी आणि समाधानी असते अशा आदर्श राज्याला रामराज्य म्हणतात. आपण सगळेच राम राज्याची कल्पना करत असताना या सगळ्या गोष्टी ओघाने लक्षात घ्यायला हव्यात.

भगवान प्रभू रामचंद्र हे केवळ एक धार्मिक व्यक्तिमत्वच नाही तर ते योग्य जीवन जगण्याचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन- सत्य, नीतिमत्ता, कर्तव्य, त्याग आणि प्रेम यासारख्या सद्गुणांनी भरलेले होते. आपल्या जीवनात हे गुण आत्मसात करून आपण एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करूया. सर्वांना राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा.!

रामावर भरवसा असल्याने आपण रामभरवसे शब्दप्रयोग करत असतो...आपल्या प्रत्येकाला आपले जीवन रामाचे चरणी समर्पित व्हावं असेच वाटत असते.

संकटे, दुःख दूर होणे साठी, सुखसमृद्धी, मनोकामना पूर्ण होण्यासाठी रामनामाचा जप आपण करा,पण त्याचबरोबर आदर्शांचा आदर्श राम म्हणत असतांना त्याचा काही तरी अंश,गुण आपल्यात उतरायला हवा.तरच रामनामाचे जपाचे सार्थक होईल.

शेवटी....
''राम नाम उच्चरा जन्माचे सार्थक करा.
नामस्मरणे मुनिजन तरले..
तारक मंत्र जपा..
ॐ श्रीराम जय राम जय जय राम...
ॐ श्रीराम जय राम जय जय राम...
आनंदाचा आनंद राम.
श्रीराम जय राम जय जय राम....
त्रिभुवन तारक आहे राम
श्रीराम जय राम जय जय राम...

***



# पंढरीची सी.टी.बस?

**ज्योतिर्मय साहित्य**

भाष्य
दत्ता तरलगट्टी सर
पंढरपूर. मो. 98816 29048

पंढरपूर नगरीची वाढ आणि हद्दवाढ ही दिवसेंदिवस होते आहे. पंढरीच्या आजुबाजुला असलेली खेडी आज हद्दीत आल्या सारखे वाटू लागले आहे. शहरालगत असलेली नगरे पंढरीच्या मध्य वस्तीतून ती तीन ते पाच कि.मी.पर्यंत पोहोचली आहेत. नगरातील नागरीकांना गावात विविध कामासाठी यायचे म्हटले तर दुचाकी गाडी शिवाय येता येत नाही. ज्येष्ठ नागरिक मोपेडवर येतात खरे पण जीव मुठीत घेऊन यावे लागते. परगावहुन आलेले भाविक त्यांची वाहने, गावातील रिक्षा, तरुण दुचाकी स्वार,टांगेवाले, नव्याने अँक्टिव्हा चालविणाऱ्या युवती,हे कधी अंगावर येतील किंवा कट मारून जातील त्याचा काही नेम नसतो.पादचाऱ्यांना देखील यांचा त्रास सहन करावा लागतो.कोणत्याही वाहनांना शिस्त नावाचा प्रकार माहितच नसतो.कुणी कुठूनही वळतो. छत्रपतींच्या पुतळ्याला वळसा घालून मंदिराकडे जायचे असते पण लोक गजानन महाराज मठाकडून येतात आणि तिथूनच मंदिराकडे वळतात. प्रत्येक कॉर्नरला वळताना रिक्षा किंवा भेळ गाडे उभे असतात. त्यामुळे पलिकडून येणारी वाहने दितच नाहीत. या ही गोष्टींचा नाहक त्रास ज्येष्ठ नागरिक व गडबडीत असणाऱ्या नोकरदार महिलांना मोठ्या प्रमाणात होतो.

सकाळ दुपार संध्याकाळ तीनही वेळी शहरात मोठ्या प्रमाणावर शहरा बाहेरील शाळांच्या स्कूल बसेस येतात. त्या जर व्यवस्थित ये जा करीत असतील तर मग सीटी बस फिरण्यास कोणती अडचण असणार आहे. शहर येवढे वाढत चालले आहे. तरी सीटीबस सुरू होत नाही ही याची अनेक नागरिकांना खंत वाटते. शासनाने एस.टी. महामंडळा मार्फत सुरू करण्यासाठी आग्रही भूमिका घेण्याची गरज आहे.एस.टी.महामंडळाच्या कडे छोट्या बसेस ही असतात. मागे मंदिर समितीने बस सुरू केली पण रिक्षा चालकांच्या मुळे बंद पडली. पण या गोष्टीला खूप वर्ष झाली.आता शहर अफाट वाढलेले असल्याने सीटीबस ही अत्यंत आवश्यक गरज बनली आहे.

स्कूल बस सारखी मीनीबस लक्ष्मी टाकळी ते विठ्ठल सहकारी साखर कारखाना, वाखरी ते संध्यावळी,वाखरते गोपाळपूर छ.शिवाय चौक मार्गे,रांझणी ते कोर्टी,कासेगाव चौक ते अहिल्या चौक भटुंबरे, ल.टाकळी ते छ.शिवाजी चौक.

अशा काही मार्गीका सहज चालू करता येतील व त्या सुस्थितीत चालतील असे वाटते.नुतन आमदारांनी व माजी आमदारांनी या प्रश्नाची उकल करून नागरिकांना दिलासा द्यावा.




## एक सुंदर रोपटे...

एक सुंदर रोपटे...
उमलेले पाहून...
आनंदून जात असे...
सूर्याच्या कोवळ्या किरणात...
वाऱ्याच्या मंद झुळूकेने...
मस्त डोलत असतांना...
डोळ्यातून अश्रू पण आनंदाने...
हळुवार गालावर...
नाजूक गुदगुल्या करत...
आनंदात चेहऱ्यावर भटकंती...

त्याला स्वतःला आठवले...
गेल्या ६/७ महिन्यापासून...
घेतलेले कष्ट...
वेळोवेळी खत, पाणी...
त्या वाढत असलेल्या
रोपटाला...
काहीही त्रास होऊ नये म्हणून...
आता मात्र थोडी काळजी
कमी...
लवकरच घेईल उंच भरारी...
त्या आकाशातील ताऱ्यांना...
भेटण्यासाठी...
काही गुजगोष्टी करण्यासाठी...

अजून थोडे मोठे झाले...
आता जवळ गेले की...
आनंदाने डोलत असे...
मिठी मारण्यासाठी धावपळ...
मग तोच त्या पानावरून...
त्या नाजूक फ़ांद्याना...
हळुवार मिठीत घेऊन कुरवळत
असे...

एक दिवस अचानक...
ते रोपटे नाहीसे झाले...
सगळी पाने अस्ताव्यस्त...
नाजूक फ़ांद्या तुडवून
टाकलेल्या...
मुळासकट कोणीतरी...

भयंकर अस्वस्थ झाला...
एव्हढेसे छोटे रोपटे...
नुकतेच वाढत असतांना...
असे उध्वस्त करून टाकले...
खूप रडू आले...
त्यापेक्षा जास्त राग...
पण काय करणार?

त्याला आठवले...
तो मित्र सांगत होता...
अरे, आमच्या सोसायटी
मधील...
९ वर्षाच्या मुलीला...
पळवून नेले...
शाळेतून...
फार हाल केले...
अत्याचार तर केलाच...
हात, पायच काय तर...
सगळ्या शरीराचे तुकडे तुकडे...

तो बेफिकीर होऊन म्हणाला
होता...
तिला सांभाळणे...
तिच्या आईवडिलांची
जबाबदारी...
आपण काय करणार?

आत्ता जाणवले त्याला...
आपण काय करणार?
या प्रश्नाचे उत्तर...

**सतीश इंदापूरकर**

## गुढी उभारू ज्ञानाची

गुढी उभारू ज्ञानाची,
चकाकणाऱ्या चंद्राची,
पुस्तकांत ती लपली,
जादू सकल विश्वाची.

कथा सांगते वाऱ्याची,
हसऱ्याची रडण्याची,
पुस्तकात रमे चांदणे,
किमया न्यारी ज्ञानाची.

अंतरिक्ष स्वप्न रंगवले,
तारे ती चमचमणारी,
पुस्तकात रे शब्दांची,
अक्षरप्रभु शब्द मैत्री .

पुस्तकात आहे भटकंती,
सुंदर बागांच्या सुगंधाची,
थकलेले मन न उमगे,
गूढता अचंबित जादूची.

बाहुली खेळात सामावली,
भावविश्व कल्पकतेची,
कथा आवडे पक्ष्यांची,
भरली सभा प्राण्यांची.

संगीत गातं त्या वाचनात,
वेध घेतो विचारांचा,
धरणीवर पंख लावायची.
पुस्तकं द्वारे ज्ञानाची

अभ्यासाला समर्पित,
जन्म सोहळा यशाचा.
सातत्याने करू वाचन
हा वसा नव्या वर्षाचा

गुढी उभारू ज्ञानाची,
सप्तरंगी घेतली भरारी,
करु साजरा महोत्सव,
वाचनाच्या नाविन्याचा.

रंगीत स्वप्नांचा धागा,
विणला आम्ही हातांनी
पुस्तकाचा हात पकडून,
चालू ज्ञानाच्या जादूनगरी.

**सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
अंबाजोगाई

## छान आहे हो माझी ताई

छान आहे हो माझी ताई
हुशार भारी गुणी ताई ।।

खूप कामाची आहे ताई
वागते जशी आजीबाई ।।

आईची सावलीच ताई
उजवा हात असे ताई ।।

काम तिचे नीटनेटके
आळशाला देते फटके ।।

माझा अभ्यास घेते ताई
चुकले की ओरडे ताई ।।

खुप छान वागते ताई
हवीहवीशी वाटे ताई ।।

ताई म्हणे,मैत्री करावी
मित्रांना मदत करावी ।।

छान आहे हो माझी ताई
हुशार भारी गुणी ताई ।।

**- अरुण वि.देशपांडे-**
**पुणे**

## उपवास.....

व्रत वैकल्याचा
आज उपवास
नको फार ध्यास
संसाराचा ।।

शरीरात अन्न
नसावे ते जास्त
जडत्वाने सुस्त
होत नाही ।।

खाद्य पदार्थात
करोनी बदल
काय तो साधेल?
उपवास ।।

असो तो लक्षात
विज्ञान विचार
हलका तो भार
उर्ध्वगामी ।।

करावे सात्विक
व्रत उपवास
असावा निवास
आत्म स्थानी ।।

नसावे ते मनी
भौतिक विधान
स्वाध्यायात मन
रमवावे ।।

**- बलराज संघई**
छत्रपती संभाजीनगर

## विठ्ठलभक्तीचा अभंग

संताचिया बोल ।
विठ्ठलाचा ध्यास ।।
तुझाच उपास ।
विठूराया ।।१ ।।
भक्तीचाच ठेवा ।
सोडूनिया माया ।।
मातीचीच काया ।
होऊ दास ।।२ ।।
परमार्थी देह ।
चित्तीला विचार ।।
एक तो आचार ।
मनोभावे ।।३ ।।
देहाची ती चक्री ।
जन्म-मरणाची ।।
विठू स्मरणाची ।
हरीकथा ।।४ ।।
संतांचीच वाट ।
विठू नाम घ्यावे ।।
काळ निघो जावे ।
चित्त साव ।।५ ।।
नामाचा गजर ।
उगम प्राणांतुनी ।।
रंग पाण्यातूनी ।
पांडुरंगा ।।६ ।।
काया हेचि माती ।
मन हेचि दासी ।।
रोज आहे काशी ।
तुजसंगे ।।७ ।।
पायरीचा धुळा ।
मस्तकी वाहावा ।।
देह विठू व्हावा ।
मोक्ष देई ।।८

**- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
मु.पो. पिंपळनेर( गोपाल नगर)
ता. साक्री जि. धुळे
९८२३११३५९४

## झाड

माझ्या अंगणात झाड
ते आहे हिरवेगार
देते मला सावली
आणि वारा थंडगार
झाडाला घालते पाणी
रोज गात गात गाणी
झाडाशिवाय माझा
मित्र नाही कोणी
झाड होई मोठे मोठे
पाने फुले फळे छोटे
बिया पडून झाडाच्या
होते नवे तयार रोपटे
आम्ही मैत्रिणी मैत्रिणी
झाडाशी मारतो गप्पा
त्या उंच झाडावर
एका चिमणीचा खोपा

**-गौरी दत्तराव डुबे**
प्रा.शा.बलसा ता.पूर्णा जि.परभणी

## गारवा

पावसाच्या येण्याने पहा
हवेत दाटला गारवा
वातावरण थंड झाले
उन्हाचा त्रास आता
कमी झाल्यामुळे खरे
सर्वांचे मन आनंदले

उन्ह जास्त तपता
उष्णताही पहा वाढली
पावसाने मिळे गारवा
नवचैतन्याने बहरली सृष्टी
मोर नाचे वनी
झाडावरी गातो पारवा

**- संध्याराणी जयहिंद कोल्हे**
काव्यसंध्या
कळंब जि.धाराशिव

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
९८५०१७७३४२
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559